# ONDC नेटवर्क 500+ शहरांमधून 3 लाख+विक्रेते/सेवा प्रदाते 1 कोटी + एसकेयू सह जोडले गेले आहे.

**ओएनडीसी नेटवर्क** चा अनेकविध उत्पादन श्रेणी आणि शहरांमध्ये सर्वत्रविकास होत आहे.



#व्होकलफॉरलोकल #आत्मनिर्भरभारत

## विक्रेत्यांच्या नेटवर्कमधील सहभागी

तुम्हाला नाव नोंदवून ओएनडीसी नेटवर्कमध्ये प्रवेश घेण्यास मदत करतील जेथे तुम्ही तुमची उत्पादने ऑनलाईन विकू शकाल.

## खरेदीदारांच्या नेटवर्कमधील सहभागी

या ॲप्लिकेशन्सवरील खरेदीदार तुम्ही ओएनडीसी नेटवर्कमार्फत ऑनलाईन विकत असलेल्या उत्पादनांपर्यंत पोहोचू शकतील.

## लॉजिस्टिक्स सेवा प्रदाते

आपली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याच्या सेवेसाठी आपण वेगवेगळ्या श्रेणींमधील लॉजिस्टिक्स सेवा प्रदात्यांसोबत आपल्या स्वतःच्या अटी ठरवू शकता.

स्कॅन करा आणि नेटवर्क सहभागींसोबत कनेक्ट व्हा

+ 91 8130935050 वर स्कॅन करा किंवा **"Hi"** म्हणा आणि ओएनडीसी नेटवर्कवर विक्री कशी करावी हे जाणून घेण्यासाठी ओएनडीसी सहाय्यकांशी चॅट करा.

ONDC
Open Network for Digital Commerce

डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क © 2023
DPIIT द्वारे एक उपक्रम

अधिक माहितीसाठी आमच्याशी येथे संपर्क साधा:
team@ondc.org

@ondc_official @ondc ltd.
@डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क (ondc) @ondc_official

ओएनडीसी नेटवर्कद्वारे भारतातील इतर विक्रेते विक्री करत आहेत हे पाहण्यासाठी www.ondc.org/sellers ला भेट द्या.

''हे केवळ माहितीच्या उद्देशासाठीच आहे. याच्या पूर्णत्वाबद्दल किंवा अचूकतेबद्दल ओएनडीसी कोणताही दावा करत नाही.''

ONDC
डिजिटल कॉमर्ससाठी ओपन नेटवर्क




# ऑनलाईन व्यवसाय सोपा आणि पारदर्शक केलेला

भारत सरकारचा पाठिंबा असलेली ओएनडीसी आपल्याला भारतभरातील खरेदीदारांना विक्री करून आपला व्यवसाय अनेक पटींनी वाढवण्यासाठी सक्षम करते.

आज आपला ऑनलाईन व्यवसाय सुरू करायचा तर आपल्याला अनेक ई-प्लॅटफॉर्म्सवर सामील व्हावे लागते आणि त्यांच्या अटी आणि शर्तींचे पालन करावे लागते. आपला व्यवसाय आपला एकट्याचा राहत नाही, कारण त्याच्यावर पहिल्यापासून शेवटपर्यंत एकाच संस्थेचे नियंत्रण राहते.



## सध्या आपल्याला ज्यांचा सामना करावा लागू शकत असेल अशी आव्हाने

| मी एक **ऑनलाईन** विक्रेता आहे | मी एक **ऑफलाईन** विक्रेता आहे |
|---|---|
| पैसे मिळण्यास उशीर | मर्यादित भौगोलिक प्रदेशांपर्यंत पोहोच |
| मोठ्या प्रमाणात कमिशन | प्रत्यक्ष दुकान ठेवण्याचे खर्च वाढलेले |
| ग्राहकविषयक डेटा वापरू शकत नाही | वारंवार होत असलेल्या विक्रींच्या संधी घेता येत नाहीत |
| मोठे प्लॅटफॉर्म्स त्यांच्या अटी आणि शर्ती बंधनकारक करतात | अधिक खरेदीदारांपर्यंत पोहोचण्यास असमर्थ |

**आपल्याला जर या समस्या येत असतील,** तर ओएनडीसी – एक विना नफा, सरकारी पाठिंबा असलेला उपक्रम आपल्या हाती सर्व अधिकार देऊन आपला व्यवसाय अधिक चांगल्या रीतीने चालवण्यास मदत करण्यासाठी येथे हजर आहे.

## मग ओएनडीसी हे काय आहे?

ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स ओएनडीसी **एखादे ॲप नाही.** ते एक **खुले नेटवर्क** आहे, ज्याला भारतातील ई-कॉमर्स क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी **भारत सरकारने पाठिंबा दिला आहे.**

- आम्ही **सर्व विक्रेत्यांना समान संधी** पुरवतो, त्यामुळे आपल्याला मोठ्या खरेदीदारांवर अवलंबून राहावे लागत नाही
- आम्ही आपला संपर्क **संपूर्ण भारतभरातील खरेदीदारांशी** जोडून देतो
- आम्ही भरपूर व्यवसाय, विस्तृत कस्टमर बेस आणि **अधिक कमाईची** खात्री करतो.
- हे सर्व काही एका साध्या, **100% विनामूल्य ऑनबोर्डिंग प्रक्रियेमुळे** होते.



### ओएनडीसी मुळे आपल्याला कसा फायदा होऊ शकेल?

| मी एक **ऑनलाईन** विक्रेता आहे | मी एक **ऑफलाईन** विक्रेता आहे |
|---|---|
| विक्रेत्यांच्या नेटवर्कमधील कोणीही सहभागी निवडा आणि स्वतःच्या अटी-शर्तींवर व्यवसाय चालवा | आपला व्यवसाय देशभरातील सर्व खरेदीदारांना दिसू शकेल |
| पैसे वेळेवर मिळवा | एकदाच नाव नोंदवा आणि आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन अनेक बायर ॲप्लिकेशन्सवर करा |
| आपल्याला आपल्या ग्राहकांची ऑफलाईन व्यवसायात जशी माहिती असते, तशीच आपल्या ग्राहकांची माहिती मिळवा | आपला व्यवसाय आणि त्याचे रेटिंग यावर परिणाम न होऊ देता सेलर ॲप्लिकेशन्स बदलता येण्याची सुविधा |
| ग्राहक आता सर्वांनाच दिसू शकतील, फक्त मोठ्या कंपन्यांनाच नाही | व्यवसाय चालवण्याचा खर्च कमी |

**वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) ?**

## ओएनडीसी नेटवर्क मार्फत मी कशी विक्री करावी?

ही एक सोपी 4 स्टेप्सची प्रक्रिया आहे.

### स्टेप 1

नावनोंदणी करा आणि अशा एका विक्रेत्याच्या ॲप्लिकेशनवर प्रवेश घ्या की जे ओएनडीसी प्रोटोकॉलचे अनुपालन करत असेल.

### स्टेप 2

नावनोंदणी पूर्ण करण्यासाठी आपले केवायसीचे दस्तऐवज सादर करा.

1. पॅन कार्ड
2. आधार कार्ड (फक्त दिल्लीसाठी)
3. जीएसटी प्रमाणपत्र
4. बँक खात्याच्या माहितीसाठी रद्द केलेला धनादेश
5. FSSAI (F&B पॅकेज केलेल्या वस्तूंसाठी अनिवार्य)

### स्टेप 3

नावनोंदणीनंतर सेलर नेटवर्कमधील सहभागी आपल्या सर्व उत्पादनांचा एक डिजिटल कॅटलॉग तयार करेल. आपल्याला एक सेलर ॲप्लिकेशनही मिळेल, तेथे आपण ऑनलाईन ऑर्डर्सचे, येणे असलेल्या किंवा आलेल्या पैशांचे व्यवस्थापन करू शकता आणि मागोवा ठेवू शकता, आणि आपली इन्व्हेंटरी अद्ययावत करू शकता.

## माझे आदेश कोठे पाहतील?

आपल्याला आपल्या सेलर ॲप्लिकेशनच्या डॅशबोर्डवर ऑर्डरच्या सूचना मिळतील. आपण आपल्याकडील त्या वस्तूंचा साठा आणि इतर मुद्द्यांवर विचार करून त्या ऑर्डर्स स्वीकारू किंवा नाकारू शकता. तसेच आपण चालू स्थितीतील ऑर्डर्सचे संनिरीक्षण करू शकता आणि आपल्या ऑर्डर्सच्या डिलिव्हरीच्या स्थितीचा मागोवा ठेवू शकता.

## सेलर ॲप्लिकेशन वापरण्याचे प्रशिक्षण मला कोण देईल?

आपल्या व्यवसायाचे ऑनलाईन व्यवस्थापन करून तो कसा वाढवावा हे शिकण्यासाठी सेलर नेटवर्क सहभागींची टीम आपल्याला प्रशिक्षण देईल आणि मदत करेल.

## माझे पैसे मला कसे मिळतील?

ऑर्डर पूर्ण झाल्यावर बहुतांश वेळा 3-7 दिवसांनी, विक्रेत्यांच्या नेटवर्कवरील सहभाग्यासोबतच्या तुमच्या व्यापारी अटी-शर्तींच्या अनुसार पैसे तुमच्या बँक खात्यामध्ये केले जातील.